# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १७०९/२०२२

**तक्रारकर्ता, श्री.विशालकुमार मथुरा गुप्ता,**
००१, वृंदावन धाम, म्हारळपाडा,
पो.वरप, ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, तहसिलदार कल्याण यांचे कार्यालय, कल्याण-मुरबाड रोड, कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, तहसिलदार कल्याण यांचे कार्यालय, कल्याण-मुरबाड रोड, कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०९.२०२१ | -- | २१.१२.२०२१ | ३०.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि. ०३.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार माहिती दिलेली नाही "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २२.०४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"मौजे रायते ता.कल्याण, जि.ठाणे येथील जमिन गुरचरणरवी जमिन श्रीकृष्ण गौशाळा, खेमाणी, उल्हासनगर २ यांच्या गौशाळेकरीता नजराण्याची रक्कम शासनास भरणा करुन मिळणेकरीता.*

*उपरोक्त विषयाबाबतचा क्र.महसूल/क्र.१/टे-७/एलबीपी/कावि-१८०४८/०८ अन्वये श्री.चंदन पितांबरदास माखीजा या अर्जदारास चिटणीस, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जारी केलेल्या पत्राची छायांकित प्रत संलग्न आहे.प्रस्तुत प्रकरणी*

या तक्रार अर्जासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, अपिलार्थी यांना विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचया आदेशानंतर देखील माहिती दिल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संदेश आव्हाड, महसूल सहाय्यक, तहसिलदार कार्यालय, कल्याण यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २८.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५

अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०३.०६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ एप्रिल, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संदेश आव्हाड, महसूल सहायक, तहसिलदार कल्याण यांचे कार्यालय, कल्याण-मुरबाड रोड, कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक,
तहसिलदार कल्याण यांचे कार्यालय, कल्याण-मुरबाड रोड,
कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.**यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०४.०५.२०२६ ( In Continuation of order dt.२२.०४.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.२२.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०३.०६.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी तक्रारकर्ता यांनी त्यांच्या दि.२९.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयोगास असे कळविले आहे की, आयोगाच्या दि.२२.०४.२०२६ रोजीच्या आदेशानंतर देखील त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नाही.

आयोगाने दि.२२.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत नि:शुल्क माहिती पुरविण्याबाबतचे आदेश दिले होते. तथापि अद्यापपर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आली नसलयाचे दिसून येते. त्याचप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संदेश आव्हाड, महसूल सहायक, तहसिल कार्यालय कल्याण यांना माहिती पुरविणेस झालेल्या विलंबाबातचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. तथापि श्री.संदेश आव्हाड यांनी असा कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांना तक्रारकर्ता यांना माहिती पुरविण्याची तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संदेश आव्हाड, महसूल सहायक, तहसिल कार्यालय, कल्याण यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी शेवटची संधी देण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या दि.२२.०४.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरवावी व त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संदेश आव्हाड, महसूल सहायक, तहसिल कार्यालय, कल्याण यांनी आयोगाच्या दि.२२.०४.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०८.०७.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०३ जून, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संदेश आव्हाड, महसूल सहायक, तहसिलदार कल्याण यांचे कार्यालय, कल्याण-मुरबाड रोड, कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक,
तहसिलदार कल्याण यांचे कार्यालय, कल्याण-मुरबाड रोड,
कल्याण (प), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.**यांचे मार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग
कोंकण खंडपीठ